नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 07/01/2021 (गुरूवार)
(सकाळ)

---

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. नरखेड – दिनांक 04/01/2021 चे 10.00 वा. ते 18.00 वा. चे सुमारास पो.स्टे. नरखेड हद्यीत फिर्यादी यांची 17 वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री गावंडे 9424043135 करीत आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. खापा :– दिनांक 06/01/2021 रोजी पो. स्टे. खापा येथील स्टाफ पो. स्टे. परीसरात पेट्रोलींग करीत असतांना त्यांनी विनापरवाना अवैधरित्या रेती चोरी बाबत 3 केसेस केलेल्या आहेत. यामध्ये विना क्रमांकाचा ट्रॅक्टरचा चालक आरोपी क्र. 1) निलेश कचरूजी सुरूजुसे, वय 26 वर्ष, 2) विना क्रमांकाचा ट्रॅक्टर मालक आरोपी क्र. 2) मुकेश पावडे, वय 40 वर्ष, एमएच–40/ए–6113 क्रमांकाचा ट्रॅक्टरचा चालक आरोपी क्र– 3) जगदीश रमेश मारोतकर वय 32 वर्ष, ट्रॅक्टर मालक आरोपी क्र. 4) ज्ञानेश्वर गुलाबराव सूरकार, वय 40 वर्ष, सर्व रा. खापा व एमएच– 40/वाय–4464 क्रमांकाच्या ट्रॅक्टरचा चालक आरोपी क्र. 5) सागर संतोष सहारे, वय 23 वर्ष रा कोदाडी, ट्रॅक्टर मालक आरोपी क्र. 6) सचीन प्रभाकर येणूरकर, वय 33 वर्ष रा. नागपूर यांनी त्यांच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या एकुण 9 ब्रास रेती किं. 16,000/– रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन रेती व वाहनासह एकुण 4,00,6000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी पो.स्टे. खापा येथे आरोपीतांविरुध्द कलम 379, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक मानकर 9422942764 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर